महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/ शाऊप २०२५/पाच/166

दिनांक: - 7 MAR 2025

वाचावे : १) कला संचालनालयाचे पत्र क्र. डिओअे-२०२४/दोन/१३९७, दिनांक १२.०६.२०२४
२) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/शाऊप २०२५/पाच/१३९, दिनांक २५.०२.२०२५
३) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे शुध्दिपत्रक क्र.कशिमं/शाऊप २०२५/पाच/१६२, दिनांक ०६.०३.२०२५

## परिपत्रक

### शासकीय उच्चकला परीक्षा २०२५

[परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य व परीक्षा शुल्काबाबत...]

उपरोक्त संदर्भ क्र. १ वरील पत्रान्वये कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत राज्यातील सर्व शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्थांना महत्वाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या असून सदर सूचनांचे प्राधान्याने व कटाक्षाने पालन करण्याबाबत कळविण्यात आले होते.

०२. त्यानुसार, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील परिपत्रकान्वये शासकीय उच्चकला परीक्षा २०२५ करिता कला परिसंस्थांची नोंदणी, प्रवेशास व परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत तसेच तद्नुषंगिक बाबींबाबत कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य व परीक्षा शुल्काबाबत या परिपत्रकाद्वारे आवश्यक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

०३. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून खालील पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शासकीय उच्चकला परीक्षा २०२५ चे आयोजन करण्यात येणार आहे. सदर परीक्षांचे आयोजन अभ्यासक्रमानुसार मौखिक, सैध्दांतिक व प्रात्यक्षिक स्वरुपात गतवर्षीप्रमाणे नोंदणीकृत प्रत्येक कला परिसंस्थावर करण्यात येईल.

१) फौंडेशन
२) आर्ट टिचर डिप्लोमा-प्रथम वर्ष (सुधारित अभ्यासक्रम)
३) आर्ट टिचर डिप्लोमा-द्वितीय वर्ष (सुधारित अभ्यासक्रम)
४) आर्ट टिचर डिप्लोमा-द्वितीय वर्ष (जूना अभ्यासक्रम)
५) इंटरमिजिएट ड्राईंग अॅन्ड पेटींग
६) डिप्लोमा ड्राईंग अॅन्ड पेटींग
७) इंटरमिजिएट अप्लाईड आर्ट
८) डिप्लोमा अप्लाईड आर्ट
९) इंटरमिजिएट स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग
१०) डिप्लोमा स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग
११) डिप्लोमा टेक्स्टाईल- प्रिंटींग अॅन्ड डाईंग
१२) डिप्लोमा टेक्स्टाईल- विव्हींग
१३) डिप्लोमा इंटेरिअर डेकोरेशन
१४) डिप्लोमा इन आर्ट एज्यूकेशन
१५) आर्ट मास्टर प्रमाणपत्र

०४. उपरोक्त अभ्यासक्रमांपैकी १) इंटरमिजिएट स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग २) डिप्लोमा स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग, ३) डिप्लोमा टेक्स्टाईल- प्रिंटींग ॲन्ड डाईंग ४) डिप्लोमा टेक्स्टाईल- विव्हींग हे ०४ अभ्यासक्रम वगळता उर्वरीत अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य कला परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या स्तरावर खरेदी करावे. परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी होणारा खर्च संबंधित अभ्यासक्रमाकरिता जमा होणाऱ्या एकुण परीक्षा शुल्काच्या ३०% रक्कमेतून भागवावा व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे. कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रम निहाय जमा करावयाचे परीक्षा शुल्क, सदर परीक्षा शुल्कातून संबंधित परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी कला परिसंस्थांनी कपात करावयाची प्रती विद्यार्थी रक्कम (३०%) व मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (७०%) याबाबतचे विवरणपत्र-अ माहितीकरिता सोबत जोडले असून त्यानुसार कला परिसंस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

०५. १) इंटरमिजिएट स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग २) डिप्लोमा स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग ३) डिप्लोमा टेक्स्टाईल- प्रिंटींग ॲन्ड डाईंग ४) डिप्लोमा टेक्स्टाईल- विव्हींग या ०४ अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरिता लागणारे साहित्य संबंधित कला परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या स्तरावर खरेदी करावे व त्याकरिता झालेल्या खर्चाची मुळ देयके कला शिक्षण मंडळाकडे सादर करावीत. प्राप्त देयकांच्या तपासणीअंती झालेला खर्च मंडळाकडून संबंधित कला परिसंस्थांना अदा करण्यात येईल. त्यामुळे, सदर अभ्यासक्रम राबविण्याऱ्या कला संस्थांनी सदर अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शुल्क (१००%) कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे. याबाबतचे विवरणपत्र-ब सोबत जोडले असून त्यानुसार संबंधित कला परिसंस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

०६. कला परिसंस्थांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांनी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतर त्यांचे परीक्षा शुल्क दिनांक १६.०३.२०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने पेमेंट गेटवेद्वारे एकत्रितरित्या भरणा करावे. मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क प्राप्त झालेल्या कला परिसंस्थेतील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक संबंधित कला परिसंस्थांना त्यांच्या लॉग इनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत सादर न केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
३) विभाग प्रमुख, कला शिक्षक प्रशिक्षण विभाग/शिल्पकला व प्रतिमानबंध विभाग, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला संस्था. (सर्व)

प्रत,

१) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/नागपूर/छत्रपती संभाजीनगर.

| Maharashtra State Board of Art Education, Mumbai | | | | |
|---|---|---|---|---|
| Government Higher Art Examinations 2025 | | | | |
| Fee Structure (विवरणपत्र -अ) | | | | |
| अ.क्र. | अभ्यासक्रम | कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून जमा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क | संबंधित परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी कला परिसंस्थेने जमा शुल्कातून कपात करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (30%) | महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (70%) |
| 1 | Foundation | 440 | 132 | **308** |
| 2 | Art Teacher Diploma- First Year (Revised) | 620 | 186 | **434** |
| 3 | Art Teacher Diploma- Second Year (Revised) | 640 | 192 | **448** |
| 4 | Art Teacher Diploma- Second Year (Old) | 640 | 192 | **448** |
| 5 | Intermediate drawing & Painting | 960 | 288 | **672** |
| 6 | Diploma drawing & Painting | 1410 | 423 | **987** |
| 7 | Intermediate Applied Art | 960 | 288 | **672** |
| 8 | Diploma Applied Art | 1410 | 423 | **987** |
| 9 | Diploma Interior Decoration | 960 | 288 | **672** |
| 10 | Diploma in Art Education | 1040 | 312 | **728** |
| 11 | Art Master Certificate | 640 | 192 | **448** |

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

| Maharashtra State Board of Art Education, Mumbai | | | |
|---|---|---|---|
| Government Higher Art Examinations 2025 | | | |
| Fee Structure (विवरणपत्र -ब) | | | |
| अ. क्र. | अभ्यासक्रम | कला संस्थांनी विद्यार्थ्यांकडून जमा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क | महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क |
| 1 | Intermediate Sculpture & Modelling | 960 | 960 |
| 2 | Diploma Sculpture & Modelling | 1410 | 1410 |
| 3 | Diploma Textile - Printing & Dyeing | 960 | 960 |
| 4 | Diploma Textile - Weaving | 960 | 960 |

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई